## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ०२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०१/२०१८

**१) मोटार सायकलच्या धडकेत तीन जखमी . :–**

दिनांक ०१/०१/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, हयगयीने चालवुन आंबाडी कडुन सिल्ली कडे जात असता फिर्यादीस व सौ. गिता शामराव ढुके रा. सिल्ली यांना किरकोळ जखमी करण्यास व स्वत: किरकोळ जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी रनभिळ तेजराम बावनकुळे वय ३० वर्ष, रा. मकरधोकडा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४, १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलने तरुणीला कट मारुन शिवीगाळ करुन डोक्यावर थापडाने मारुन पुन्हा मारण्याची धमकी दिली. . :–**

दिनांक ०१/०१/२०१८ चे १५.३० यातील फिर्यादी ही कॉलेज मधुन गावी परत येत असता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने चालवुन फिर्यादीला पिंपळगाव येथे कट मारला त्यात त्याचे बाईकचा हॅंडल फिर्यादीचे खांदयाला लागुन बाईक चा हॅंडल खांदयावरील बॅगला लटकुन बॅग फाटुन खाली पडली व खांदयाला मार लागला त्यानंतर फिर्यादीस आरोपीने शिवीगाळ करुन डोक्यावर थापडाने मारले व त्यानंतर फिर्यादीस सायंकाळी हयाच प्रकरण वरुन शिवीगाळ करुन मारण्यास धावला तु पुन्हा कोठेही भेटलीस तर तुला मारीन अशी धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३६,३२३,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**३) बोलेरो गाडी चालकाने इंडीका व्हीस्टा गाडीला धडक देवुन गाडीचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०१/०१/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी चंद्रकांत गंगाधर नारनवरे वय ३५ वर्ष, रा. मोहगाव झीलपी जि. नागपुर हा त्याचे इंडीका व्हीस्टा गाडी क्र. एमएच ४९ एफ १६७३ ने जमनापुर ते तुळमापुरी जाणाऱ्या रोडने जात असता आलेबेदर जवळ समोरुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे वाहनाचे ड्रायव्हर साईडने डॅश मारल्याने अंदाजे २५,०००/–रु. चे नुकसान करुन अपघात केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोडंगे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

**अ**) दिनांक ३१/१२/२०१७ चे २३.१० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन दारु पिवुन दारुचे नशेत त्रिमुर्ती चौक भंडारा येथे चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्द्ारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहालचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. फंदे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पो.ना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**ब**) दिनांक ०१/०१/२०१८ चे ०२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन दारु पिवुन दारुचे नशेत राजीव गांधी चौक भंडारा येथे आडवी तिडवी चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे दारु पिल्या बाबतचे वैद्यकीय परीक्षण अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी पोउपनि. बोरकर भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पो.ना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**क**) दिनांक ०१/०१/२०१८ चे ००.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन दारु पिवुन दारुचे नशेत गांधी चौक भंडारा येथे चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे दारु पिल्या बाबतचे वैद्यकीय परीक्षण अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी पोउपनि. चेके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पो.ना. साबळे पोलीस पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) मोटार सायकलने सायकल चालकास धडक देवुन जखमी होवुन औषधोपचार दरम्यान इसमाचा मृत्यु :—**

दिनांक ०७/१२/२०१७ चे २१.३० वाजता दरम्यान यातील मृतक फुलचंद नत्थूजी वझोडे वय ५५ वर्ष, रा. पाचगाव हा त्याचे सायकलने आसगाव वरुन पाचगाव येथे येत असतांना मृतकचे सायकलला बेलाटी/ मेडीकल कॉलेज नागपुर येथे मोटार सायकलने धडक दिली त्यात त्याचे डोक्याला व उजवे हाताला मार लागुन जखमी झाल्याने त्यास औषधोपचारा करीता आस्था हॉस्पीटल ब्रम्हपुरी येथे नेवुन प्राथमीक उपचार करुन तेथील डॉ. ने नागपुर येथे रेफर केल्याने त्यास मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र ००/१८ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने पो. स्टे ला सरतर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.ना. चनाब पो.स्टे पालांदुर हे करीत आहेत.

६) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :—

दिनांक ०१/०१/२०१८रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहरनगर, कारधा, साकोली येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारू ७५०मिली लिटर हातभट्टी दारु किंमती २०५०/—रु. तसेच १ लिटर ८०० मिली लिटर विदेशी दारु किंमती १४००/—रु. असा एकुण ३४५०/रु. चा माल जप्त करण्यात आला.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ०१/१२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी — ०२ तीन सिटर वाहनांवरती— २२ केसेस व ईतर वाहनांवरती —५६ केसेस करण्यात आलेले आहे.

(मपोउपनी. माया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.